
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - III
July - September - 2020
English / Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | महिला सक्षमीकरण समोरिल आव्हाणे<br>**गोरखनाथ जिजेबा अवचार** | ५३-५६ |
| १३ | ग्रामीण अर्थव्यवस्थेत शाश्वत रोजगारात हस्तकला व हातमाग उद्योगाचे योगदान<br>**डॉ. वासंती निचकवडे** | ५७-६२ |
| १४ | साखरफेरा : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या शोकांतिकेची कहाणी<br>**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे** | ६३-६७ |
| १५ | भारत पाकिस्तान यांच्यातील मुख्य समस्या : काश्मीर<br>**प्रा. डॉ. एन. झेड. पाटील** | ६८-७३ |
| १६ | आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचे अध्ययन<br>(विशेष संदर्भ-गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुका)<br>**डॉ. प्रमोदकुमार केशव नंदेश्वर** | ७४-८२ |
| १७ | भारतातील अन्नसुरक्षीततेवर हवामान बदलाचा परिणाम<br>**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन** | ८३-८९ |
| १८ | नरहर कुरूंदकरांचे सांस्कृतिक इतिहास लेखन<br>**डॉ. क्षिरसागर वी. एस.** | ९०-९५ |
| १९ | आदिवासींचे बांबू व्यवस्थापन एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. कुंदन एस. दुफारे** | ९६-१०० |
| २० | शीख स्त्रियांच्या सामाजिक उत्थानात गुरूनानकांचे योगदान<br>**डॉ. हरी नारायण जमाले**<br>**संध्या उद्धवराव करमनकर** | १०१-१०६ |
| २१ | कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी कौटुंबिक हक्क शिक्षण कार्यक्रमाची<br>निर्मिती आणि परिणामकारकतेचा अभ्यास<br>**डॉ. एकनाथ वाजगे** | १०७-११२ |
| २२ | लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सर्वोत्तम पद्धती : एक अभ्यास<br>**प्रा. संभाजी पुंडलिक व्यालीन** | ११३-११८ |




PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

74

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १८. नरहर कुरूंदकरांचे सांस्कृतिक इतिहास लेखन

**डॉ. शिरसागर बी. एस.**
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

साहित्य क्षेत्रामध्ये महाराष्ट्रात नरहर कुरुंदकरांचे स्थान अग्रणी आहे. केवळ साहित्यामध्येच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या वैचारिकतेचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या विचारविश्वाची मोठी छाप महाराष्ट्रावर होती. सामाजिक, राजकीय, स्वातंत्र्य, लोकशाही विषयक लेखनातून कुरुंदकरांनी सर्व महाराष्ट्राचे मंथन केले. अध्ययन व अध्यापन करणे हा त्यांचा मुळ स्वभाव. त्यांनी तत्कालीन समाज व राजकारण यामध्ये निर्माण झालेल्या विविध प्रश्नावर लेखन केले आहे. याशिवाय दलितांच्या समस्या, मुस्लीम संदर्भातील लेखन, काव्यशास्त्र व हैद्राबाद मुक्तीसंग्राम विषयक त्यांनी केलेले लेखन हे त्यांच्या बुध्दीचा पल्ला फार मोठा होता. हे स्पष्ट करणारे आहे. कुरुंदकरांनी ३५ ग्रंथाचे लेखन करुन या ग्रंथाद्वारे विविध तत्कालीन प्रश्नावर चर्चा केली. याशिवाय प्रस्तावना लेखन, पुस्तक परिचय व परिक्षण करुन, विविध विषयावर आपले मत ठामपणे मांडले. खरे म्हणजे भाषण आणि लेखन हा कुरुंदकरांना छंद किंवा व्यवसाय नव्हता तर तो एक कर्तव्याचा भाग होता. जेंव्हा एक व्यक्ती अनेक विषयामध्ये चिकित्सक पध्दतीने आपले मत मांडतो. त्याविषयामध्ये आपले स्थान निर्माण करतो. तेंव्हा त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे सर्वसामान्य माणसापेक्षा वेगळे असे असते. कुरुंदकरांचेही असेच होते. त्यांच्यामध्ये लक्षणीय स्मरणशक्ती होती. समाधीपणा, मुद्देसूदपणा व तर्कशुध्दता हे गुण त्यांच्या अंगी रुजले होते. श्रध्दा आणि चिकित्सेचे चमत्कारीक मिश्रण म्हणजे नरहर कुरुंदकर.

इतिहास हे कुरुंदकरांचे आवडीचे ज्ञानक्षेत्र. त्यांच्या चिकित्सक वृत्तीमुळेच ते इतिहास लेखनाकडे वळले. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहास लेखनाबरोबर कुरुंदकरांनी सांस्कृतिक इतिहासाचेही विपुल प्रमाणात लेखन केले आहे. प्रस्तावना लेखन, पुस्तक परिक्षण व परिचयेतून त्यांनी आपले सांस्कृतिक इतिहासाबाबतचे मत विचार प्रदर्शित केले आहे. विशेषत: ढेरे. रा.ची. यांच्या 'चक्रपाणी' या ग्रंथास लिहलेली प्रस्तावना म्हणजे महाराष्ट्राच्या संदर्भात त्यांनी केलेली सांस्कृतिक इतिहासाची विशेष चर्चा होय. कुरुंदकर एक चतुरस्त्र व जीवनवादी दृष्टीने समिक्षक होते. या अनुषंगाने त्यांचे प्राचीन साहित्य संशोधनविषयक विचार महत्वाचे आहे. जे ग्रंथ काव्य म्हणून महत्वाचे नसतात त्यांचे सांस्कृतिक इतिहासाचे साधन म्हणून अपार महत्व असते.[1] असे त्यांनी जाणीवपूर्वक नमूद केले आहे. कारण काव्य, चित्रकला यामधूनही कुरुंदकरांनी सांस्कृतिक इतिहासाकडे पाहिले आहे.

'यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा' या पुस्तिकेच्या प्रस्तावनेमध्ये ही कुरुंदकरांनी आपले सांस्कृतिक इतिहासाविषयीचे विचार प्रकट केलेले आहे. या पुस्तिकेतील म्हैसूर विद्यापिठातील डॉ. एम.एस. कृष्णमूर्ती व सांगलीच्या प्रा. तारा भवाळकर यांचे लेख म्हणजे 'यक्षगान' संदर्भातील मराठी नाटक व नृत्य नाट्यशैलीचे



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

आहेत. हे लेख मराठी रंगभूमी, मराठी नाटक या दोन्ही दृष्टीने आणि रंगभूमिच्या प्रयोगप्रधान रुपाच्या उगमांचा शोध घेण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. असे त्यांना वाटते. साहित्यप्रकार असो किंवा कलाप्रकार असो त्यांचा उगमांचा आपण जेंव्हा ऐतिहासिकदृष्ट्या शोध घेतो. त्योवेळी हा शोध स्पष्ट नसतो तेंव्हा उजेडात आलेली नवी माहिती, काही जुने गुंते उळगडणारी ठरते तर काही नवे गुंते निर्माण करणारी ठरते.[२] अशा प्रकारे नवा शोध लावण्याचा प्रयत्न डॉ. कृष्णमूर्ती व तारा भवाळकर यांच्या निबंधावर भास्य करतांना केला आहे. तसेच यक्षगानात पात्रधारी व अर्थधारी असे दोन शब्द येतात. याबाबतही ते स्पष्ट उकल करतांना दिसतात.

रा. चि. ढेरे यांच्या चक्रपाणी या ग्रंथला लिहिलेल्या प्रस्तावनेत ढेरेविषयी कुरुंदकर म्हणतात. मराठी साहित्याच्या आधारे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची सत्वधारा जपणारे रा. चि. ढेरे हे या प्रवाहाने पाईक आहेत. महाराष्ट्रात अत्यंत समृध्द असलेले. परंतू उपेक्षित राहिलेले हे दालन त्यांनी अभ्यासकापुढे खुले केले. सांस्कृतिक इतिहासाची जिज्ञासा ढेरेंनी जेवढी दर्शविली तेवढी इतरांना दर्शविता आली नाही. धार्मिक परंपरांचे वाङमयावरील संस्कार हा ढेरे यांचा न संपणारा जिज्ञासेचा विषय आहे. त्यांमुळेच ढेरे यांचे वाङमय ऐतिहास संशोधन सांस्कृतिक इतिहासाच्या संशोधनाचा भाग बनत चालले आहे.[३] अशा प्रकारे रा.चि. ढेरे हे सांस्कृतिक इतिहास संशोधनाचे पाईक आहेत. असे कुरुंदकरांनी नोंदविले आहे. यामुळेच सांस्कृतिक इतिहास हा तत्कालीन सामाजिक परिस्थिती समजण्यासाठी अधिक जवळ केला पाहिजे, असा उपदेश कुरुंदकरांनी केला आहे.

'मुडलगीचे स्वामी' या ग्रंथाचे परिक्षण करतांना प्राचीन मराठी साहित्य हा सांस्कृतिक इतिहासाच्या संशोधनातील महत्वाचा घटक आहे. कारण संशोधनाच्या क्षेत्रात काही योगायोग असतात. महत्वाचे भांडार उपलब्ध होणे हा प्रकार असा असतो. पण दैवगत्या हाती आले त्यांचे महत्व ओळखणे, साधनांचे संपादन व विवरण करणे, त्यातून जी माहिती उजेडात येते तिचे दुवे नीट जुळविणे हा भाग परिश्रमाचा व प्रज्ञेचा असतो. या मराठी साहित्यरचनेचे महत्व काव्य म्हणून नसून सांस्कृतिक इतिहासाचे साधन म्हणून आहे.[४] प्राचीन मराठी साहित्याकडे कुरुंदकर सांस्कृतिक इतिहासाचे साधन म्हणून पाहावे, असा नवा दृष्टीकोण त्यांच्यामध्ये प्रगट होत गेल्याचे दिसते. 'लोकसाहित्याची रुपरेखा' हा दुर्गा भागवत यांचा लोकसाहित्यावर लिहलेला ग्रंथ. या ग्रंथावरील समिक्षेत ते म्हणतात. ''लोकसाहित्याची व्यापक अभ्यासाची पध्दतशीर रुपरेखा या ग्रंथामुळे मराठीत प्रथमच उपलब्ध होत आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक अशा इतिहासाचे अभ्यासाचे हे साधनसाहित्य आहे.[५] त्याकडे लक्ष वेधून याची जाणीव ठेवावी असा विचार ते मांडतात. लोकसाहित्याची चिकित्सा करणारे जे विविध संप्रदाय उदयाला कसे आले? संप्रदायाच्या समर्थकांचे कार्य कसे व कोणते आहे, याची ओळख दुर्गा भागवतांनी करुन दिली असली तरी या विविध संप्रदायापैकी प्रत्येकाच्या उणिवा आणि सामर्थ्यस्थान याकडे त्यांचे लक्ष तितक्या प्रमाणात गेलेले नाही.[६] अशा प्रकारे दुर्गा भागवतांच्या उनेक उणिवा त्यांनी समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे तर दुर्गा भागवत यांच्या ग्रंथाद्वारे कुरुंदकरांनी सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेतला. दुर्गा भागतांच्या ग्रंथाच्या परिक्षणातून कुरुंदकरांनी समतोल अभ्यासाची पध्दतीही प्रकट होतांना दिसते. लोकसाहित्याची रुपरेखा हा ग्रंथ सांस्कृतिक इतिहासाचा अरसा आहे. भारतीय सांस्कृतिक इतिहास समजावून घेण्यासाठी हा ग्रंथ 'अव्वल दर्जाचा ग्रंथ' म्हणून या ग्रंथाचे मोल मान्य करुन कुरुंदकरांनी म्हटले कि, '' कोणत्याही ग्रंथाचा मोठेपणा नव्या कक्षा निर्माण करण्यावर व चिंतनाला प्रेरक होणावर असतो. ''[७] अशा प्रकारे उदात्तीकरण वा गौरवापेक्षा कुरुंदकरांनी मूल्यमापनावर भर दिला आहे. 'लोकसाहित्याचे



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

अंतरंग' या प्रभाकर मांडे यांच्या ग्रंथाना शोध घेतांनी लोकसाहित्याचा समाजजीवन व लोकविधीशी संबंध आहे. हा मुद्दा आपण प्रमाण मानला तर परंपरागत समूहमनात साठलेले सर्व विधी, समजूती आणि या विधी व समजुतीच्या मुळ उगमाचा शोध हे लोकसाहित्याच्या उगमातील केंद्रीय स्थान होऊन जाते.[८] असे मार्मिक भाष्य कुरुंदकर करतात. तसेच सांस्कृतिक साहित्याची सामग्री म्हणून लोकसाहित्याचा विचार करतांना त्यांनी समाजजीवनाच्या संदर्भात मुलतः निर्माण झालेल्या साहित्याचा विचार झाला पाहीजे, परंपरागत लोकमानस ज्या – ज्या रुपात निर्माण होईल ती सर्व साधने समुच्चयाने अभ्यासली पाहिजे... तर कल्पनेने प्रभावीत झालेल्या मनाचे अवशेष लोकसाहत्यात विविध रुपात आढळतात.[९] ही तीन मुद्दे मांडून कुरुंदकर 'लोकसाहित्याचे अंतरंग' या ग्रंथातून सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेतात. साहित्याच्या संस्कृतिचा अभ्यास करतांना कुरुंदकरांनीची प्रतिमा अधिक उजाळलेली दिसून येते. कुरुंदकर म्हणतात, ''वारकरी साधू संताचे वाङमय हे हिंदू धर्माच्या चौकटीत निर्माण झालेले वाङमय आहे. या वाङमयाचा अभ्यास इतिहास, संस्कृती व साहित्य या संदर्भात करावयाचा असतो.[१०] अशा प्रकारे विचार ते प्रकर्षाने मांडतांना दिसतात. 'धार आणि काठ' या समीक्षात्मक कादंबरीतून त्यांनी वि.का. राजवाडे यांचे ऋण मान्य करुन राजवाडेंनी कांदबरी वाङमयाशी निगडीत असणारे तात्विक प्रश्न लक्षात घेणे हे एक आश्चर्य आहे. यादृष्टीने वि. का. राजवाडे यांच्या निबंधाचा विचार जर अधिक गंभिरपणे झाला असता. तर मराठी सामीक्षेवर त्याचे इष्ट परिणाम झाले असते.[११] अशा प्रकारच्या विवेचनाने कुरुंदकर हे इंटेलेक्च्युअल हिस्ट्री यासारख्या नव्या प्रांतात अभ्यासाचे उपेक्षित पैलू स्पष्ट करतांना दिसतात.

महाडचा मुक्तीसंग्राम हे महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे प्रतिक आहे. प्रा. राम विवलकर व प्रा. झुंबरलाल कांबळे यांच्या 'महाड' विषयक लेखनातून कुरुंदकरांनी सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेतांना कुरुंदकर 'महाडचा मुक्तीसंग्राम' हा वैभवशाली समाजक्रांतीचा आरंभ बिंदू मानतात.[१२] कारण पारंपारिक रुढी परंपरांना या आंदोलनामुळे हादरा बसला. महाडला तळयावरील पाणी पीणे किंवा मंदिरात जाऊन पूजा करणे यासाठी हे आंदोलन नव्हते. तर “भारतभर पसरलेल्या दलितांना लाचारीच्या निर्देतून जागे करील, त्यांची अस्मीता आणि आत्मविश्वास फुलवून त्यांना संघटीत करील यासाठी महाडचा मुक्तीसंग्राम बाबासाहेबांनी पुढे रेटला होता. खरे म्हणजे महाडचा मुक्तीसंग्राम हे एक धर्मचक्र परिवर्तनच होते. महाड हा या धर्मप्रवर्तनाचा एक आरंभबिंदू आहे.”[१३] महाडचा मुक्तीसंग्राम हा भारतीय सांस्कृतिक इतिहासाचा भाग आहे. या अर्थाने याचे विस्ताराने लिखाण व्हावे असे कुरुंदकरांना वाटते. माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या “अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती” या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेतून कुरुंदकरांनी भारतातील दलितांचे प्रश्न व अमेरिकेतील निग्रोंचे प्रश्न यातील साम्य व भेदस्थळे स्पष्ट करतांना तौलनिक दृष्टिकोण स्विकारला आहे. 'विदेशी गुलामांकडे पाहण्याची वृत्ती निराळी. निग्रो व दलितांमधील हा महत्वाचा फरक आहे. दोन्हीकडे मुक्तता झाली. पण समाजव्यवस्थेत पुनःस्थापना मात्र झाली नाही.[१४] असा मुलगामी विचार ते मांडतात. अमेरिकेतील निग्रोची गुलामगीरी रद्द करणारा कायदा इ.स. १८६३ चा त्यानंतर ७८ वर्षानंतर भारतीय अस्पृश्यता नष्ठ करणारा कायदा झाला. परंतू ज्या पध्दतीने भारतामध्ये कायद्यान्वये अनेक बाबी होतांना दिसतात. परंतू अमेरिकेत मात्र निग्रोबाबतचे कायदे मोडलेले दिसतात. याशिवाय दलितांकडे पाहतांना भारतीय नेते कोणत्याही पक्षाचे असो ते अमेरिकेतील नेते ज्याप्रमाणे निग्रोकडे 'परके' या पध्दतीने पाहतात. तसे



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI
77

भारतीय अस्पृश्यांकडे पाहत नाही. हा फरकही त्यांनी समोर आणला आहे. अशा प्रकारे निग्रो व भारतीय अस्पृश्य यांमधील साम्य व वेगळेपणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न कुरुंदकरांनी केला आहे.

कुरुंदकरांनी शैव व वैष्णव पंथांच्या प्रभावाची मीमांसा, त्यातील वारकाव्याचेही मार्मीक विश्लेषण केले आहे. शैवमार्ग तंत्र, वामाचार व कर्मकांड त्यांच्याशी एकजीव झाला असल्याने बहुजन समाज शैवमार्गापासून दूर जाऊन या समाजात वैष्णव भक्तीची लोकप्रियता वाढली होती.[१५] तसेच महानूभाव व वारकरी संप्रदायांच्या कार्याची चिकित्सा करतांना ते दोन्ही पंथांना रुढ परंपरेचे विरोधक मानतात. सांस्कृतिक इतिहासाचा शोध व्हावा. या दृष्टीने महानूभाव पंथाचे भ्रम व विभ्रम शोधुन महानुभाव वाङमयाचा सर्व बाजूंनी चिकित्सक अभ्यास झाला पाहिजे. याचीही ते सतत चर्चा करतात. संस्कृतिक इतिहासाचा शोध घेतांना कुरुंदकरांनी मूर्तिविज्ञानाचा अभ्यास केला आहे. मूर्तीचे लोकपरंपरेतील सामाजिक उगम तपासले पाहिजेत. असा वेगळा विचार करुन 'चक्रपाणी' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात. 'चांगदेवाचे मणिसिध्द हे एक नाव आहे. या शब्दाचा अर्थ उध्वरिता असा आहे. हा शब्द वज्रायन परंपरेत येतो. या परंपरेचे अस्तित्व बौध्द लेण्यातून डॉ.आर.एस. गुप्ते यांनी सिध्द केले.[१६] यावरुन कुरुंदकर युक्तीवाद करतात कि, 'नागार्जून' हा बौध्द असावा. असा एक वेगळाच शोध त्यांनी सांस्कृतिक इतिहासामध्ये लावलेला निदर्शनास येतो. मुर्ती विज्ञानाचा अभ्यासातील कुरुंदकरांचा दृष्टिकोण वैशिष्ट्यपूर्ण आहे. ब्रहमानंद देशपांडे यांच्या 'शोधमुद्रा' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कुरुंदकर म्हणतात. 'ईराई ही ग्रामदेवता महाराष्ट्रात आहे. त्याची नोंद घेतली पाहिजे. काही ठिकाणी म्हसोबा, खंडोबा या देवता विरोबा असल्यामुळे म्हाळसा ही ईराई झाली आहे. ती विराई या शब्दाचे रुप आहे. म्हणजे ईराई ही देवता महाराष्ट्राची ग्रामदेवता आहे.'[१७] अशाप्रकारे लोकदेवतांचे स्थानिक, सामाजिक स्थान स्पष्ट केले आहे. याशिवाय भाषा व व्युत्पत्तिशास्त्राच्या आधारे ही त्यांनी सांस्कृतिक इतिहासावर चर्चा केली आहे. या संदर्भात ते लिहतात. "वेरुळच्या कैलास लेण्याचे जुने नाव हे माणकेश्वर लेणे असे आहे. मणी हा बौध्द वाङमयात लिंगवाचक शब्द आहे. त्यामुळे माणकेश्वर हे शंकराचे नाव महाराष्ट्रातील वज्रयान बौध्दाच्या प्रभावाचे अवशेष असण्याचा संभव आहे."[१८] असा वेरुळ लेणीच्या प्राचीन नावाचा भाषा व व्युत्पत्तिशास्त्राच्या आधारावर मतितार्थ कुरुंदकरांनी काढला आहे.

'शकुंतलाः इतिहास, पुराण आणि काव्य' या लेखाद्वारे लोकमानसातील शकुंतलेचे चित्र व पुराणास आधारीत ऐतिहासिक चित्र कसे वेगळे आहे. तसेच शकुंतलेचे आख्यान हे पौराणिक आहे. विलासी राजा व त्याच्या कामुकतेचा फायदा घेऊन आपला पुत्र युवराज करु इच्छिणारी, संसारात रस नसणारी व्यवहारी शाकुंतला चित्रित केली गेली आहे. मात्र इतिहास हा वेगळा आहे. तुर्वसू आणि कण्व यांचा दुष्यंताविरोधी संघर्षाचा हा इतिहास आहे.[१९] कुरुंदकरांनी आपल्या लेखाद्वारे स्पष्ट केली कि कालिदास हा काव्य लिहित होता, पुराणात सुत्रांनी संग्रहित केलेला इतिहास समाविष्ट होता. हे लोकमानसापर्यंत पोहचविले पाहिजे. अशाप्रकारे शकुंतलेची मूळ ऐतिहासिक कथा पुराणाचा आधार घेऊन त्यांनी समोर आनली आहे.

सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासात संगित हा अविभाज्य भाग आहे. असे प्रमेय मांडून कुरुंदकर भारतीय संगिताच्या ऐतिहासिक वाटचालीचा आलेखच रेखाटतात. अमीर खुसरोपूर्वी संगित राजदरबार व देवळे यात गुंतलेले होते. खुसरोने ते आम जनतेत पसरविले हा समज चूकीचा आहे. भारतीय संगित हे मुस्लीम काळाच्या अगोदर ही वैभवाच्या व लोकप्रियतेचे अवशिष्ट आहे. भारताप्रमाणेच ग्रिकांमध्येही सप्तस्वर व



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

चोवीस श्रुती आहेत. हे साम्य लक्षात घेऊन ज्ञानकोषकारांनी भारतीय संगितावर ग्रिकांचा दाट परिणाम झाल्याचे म्हटले आहे. या संदर्भात कुरुंदकर म्हणतात की, भारतीय संगितावर ग्रिकांचा परिणाम झाला नसून ग्रीक संगितावर भारतीय संगिताचा परिणाम झाला आहे.[१९] सप्तस्वरांचा ग्राम हा भारतात आहे. भारतीय श्रुतीविवेचनाचा आधार मध्यममार्गीय च्युतपंचम हा आहे. हा ग्रीकांत येत नाही. तोपर्यंत भारतीय संगीतावर ग्रीकांचा परिणाम सांगण्यात अर्थ नाही. उलट बौद्ध धर्म ज्या ज्या ठिकाणी गेला त्या त्या ठिकाणी भारतीय संगित घेऊन गेला.[२०] म्हणून चीन, जपान, जावा, सुमात्रापर्यंत भारतीय संगिताने आपली छाप टाकली होती. ही वस्तुस्थिती आहे. याशिवाय वात्सायनाचे कामसूत्र, गाथा, सप्तशती, गुप्तकालीन वीणावादक, समुद्रगुप्ताची नाणी, याज्ञवल्क्यस्मृती, मत्स्यपुराण, चतुर्वर्ग चिंतामणी, भविष्योत्तर पुराण, भरतमुनींचे नाट्यशास्त्र इत्यादींची चर्चा करीत कुरुंदकर भारतीय संगिताकडे स्वतंत्र दृष्टीने पाहतात. भारताची परंपरा आपण समृद्ध करीत आहोत. त्यात थोडेफार तपशिल एखाद्या बदलले असतील.[२१] अशाप्रकारे भारतीय कलेमधील संगीताचा इतिहास सदोष असून तो नव्याने लिहिला पाहिजे, यावर त्यांनी भर दिला आहे. याशिवाय 'भ्रमर', 'श्यामा' इत्यादी शब्दांची महाभारतकालीन व्युत्पत्ती शोधतांना विदुषींचे प्रयत्न त्यांना चिंतनीय वाटतात. परंतु पुरावा महत्वाचा हे ही ते दर्शवितात.

सांस्कृतिक इतिहासाच्या नव्या अभ्यासपद्धतीविषयी ते म्हणतात की, समाजशास्त्रीय अभ्यासाची एक महत्वाची व अपरिहार्य ठरणारी पद्धत आहे. शुद्ध ऐतिहासिक पद्धतीपेक्षा या पद्धतीचे निराळेपण, वेगळेपण समजून घेतले पाहिजे. आणि या पद्धतीच्या वापराची अपरिहार्यता आपण समजून घेतली पाहिजे.[२२] याकडे ते कटाक्षाने लक्ष वेधतात.

**सारांश**

इतिहासकार म्हणून नरहर कुरुंदकरांचे योगदान फार मोठे आहे. खरे म्हणजे वाङमयीन समीक्षेच्या चिकित्सेतून कुरुंदकर इतिहासमिमांसेकडे वळतात. कुरुंदकरांचे सांस्कृतिक इतिहासातील विवेचन हे अस्सल साधने जमा करून, अथवा एखादा संशोधनाचा कार्यक्रम हाती घेऊन आलेले नाही. तर कुरुंदकरांचे इतिहासविषयक विवेचन हे अन्वेषणावर आधारीत विश्लेषण करण्यावर भर देणारे आहे. नरहर कुरुंदकरांची इतिहास लेखनातील एक वेगळी पध्दत प्रामुख्याने दिसून येते. ती म्हणजे अगोदरच काटेकोरपणे घटनांचा तपशील पडताळून पाहावयाचा, तसेच संबंधित संदर्भ व पुरावे यांचा करुन अभ्यास करावयाचा, मगच सत्यशोधनाचा प्रयत्न करायचा ही त्यांची सागसर अभ्यास पध्दती त्यांच्या इतिहासलेखनात विशेषत्वाने जाणवते. कुरुंदकरांचे सांस्कृतिक इतिहासावरील भाष्य ही प्रामुख्याने त्यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथाच्या प्रस्तावना लेखनाद्वारे समोर आले आहे. या प्रस्तावना लेखनामधून याशिवाय विविध पुस्तक परिक्षण व मुल्यमापनातून कुरुंदकरांनी सांस्कृतिक इतिहासाचा शोध तर घेतलाच परंतु त्याचबरोबर जे जे ग्रंथ सांस्कृतिक इतिहासाचे मानक स्तंभ आहेत. त्यांच्यातील गुण दोष याविषयी ही त्यांनी निर्भीडपणे आपले मत व्यक्त केले आहे. सांस्कृतिक इतिहासाचा मुळ ठेवा हा साहित्य आहे. साहित्यातूनच खरा सांस्कृतिक इतिहास दृष्टीक्षेपास येत असतो. असा वेगळा विचारही त्यांनी सांस्कृतिक इतिहास विषयक भाष्य करतांनी केला आहे. एक मार्मीक समिक्षक, मीमांसक, विवेचक म्हणून कुरुंदकरांनी केलेल्या सांस्कृतिक इतिहास लेखनाला विशेष महत्व प्राप्त होते.

**संदर्भ**

१. वाडीकर, भु.द., भगद दत्ता. (संपा), (१९८७). परिचय : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. १०८
२. ढेरे रा.चि. (संपा), (१९९१). रंगविमर्श: पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. २८०
३. रसाळ, सुधीर. (संपा), (१९८५). *नरहर कुरुंदकर विशेषांक*, प्रतिष्ठाण, पृ. ९३
४. रसाळ, सुधीर. (संपा), *नरहर कुरुंदकर विशेषांक*, प्रतिष्ठाण, पृ. ३१
५. कुरुंदकर, नरहर. (१९६७). मागोवा : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपणी पब्लिशर्स. पृ. १२३
६. रसाळ, सुधीर. (संपा), *नरहर कुरुंदकर विशेषांक*, प्रतिष्ठाण, पृ. ५१
७. कुरुंदकर, नरहर. (१९६७). मागोवा : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपणी पब्लिशर्स. पृ. १५१
८. कुरुंदकर, नरहर. (१९७८). ओळख : पुणे. साहित्य साधना प्रकाशन. पृ. १३९
९. कुरुंदकर, नरहर. (२०००). भजन : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. ३७
१०. कुरुंदकर, नरहर. (२०००). भजन : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. ६४
११. कुरुंदकर, नरहर. (१९९८). धार आणि काठ : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपनी. पृ. ५
१२. कुरुंदकर, नरहर. (२०००). भजन : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. ५२
१३. कुरुंदकर, नरहर. (२०००). भजन : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. ६६
१४. कुरुंदकर, नरहर. (२०००). भजन : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. ७९
१५. ढेरे, रा.चि. (१९७७). चक्रपाणी : पुणे. विश्वकर्मा साहित्यालय. पृ. २४
१६. ढेरे, रा.चि. (१९७७). चक्रपाणी : पुणे. विश्वकर्मा साहित्यालय. पृ. ३७
१७. देशपांडे, ब्रम्हानंद. शोधमुद्रा. पृ. ६
१८. देशपांडे, ब्रम्हानंद. शोधमुद्रा. पृ. ११
१९. कुरुंदकर, नरहर. (१९६७). मागोवा : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपणी पब्लिशर्स. पृ. ७०
२०. कुरुंदकर, नरहर. (१९६७). मागोवा : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपणी पब्लिशर्स. पृ. ०८
२१. कुरुंदकर, नरहर. (१९६७). मागोवा : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपणी पब्लिशर्स. पृ. ३६
२२. कुरुंदकर, नरहर. (१९६७). मागोवा : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपणी पब्लिशर्स. पृ. ४३
२३. वाडीकर, भु.द., भगद दत्ता. (संपा), (१९८७). परिचय : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन. पृ. १७ – १८

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI